# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.12.2024** **वारःबुधवार**

---

1. मानवाधिकारांचं संरक्षण करण्यासाठी सुरक्षित आणि न्याय्य डिजिटल वातावरण असावं-राष्ट्रपतींची सूचना
2. यंदाचे राष्ट्रीय पंचायत पुरस्कार आज प्रदान केले जाणार
3. सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी आजपासून; पंतप्रधान विद्यार्थ्यांशी संवाद साधणार
4. ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना संयुक्त राष्ट्रांचा 'चॅम्पियन ऑफ अर्थ' जीवनगौरव पुरस्कार जाहीर आणि
5. भारत-ऑस्ट्रेलियादरम्यान 50 षटकांचा महिला क्रिकेट संघाचा आज अंतिम सामना

**<u>राष्ट्रपती</u>**

मानवाधिकारांचं संरक्षण करण्यासाठी सुरक्षित आणि न्याय्य डिजीटल वातावरण असणे आवश्यक असल्याची सूचना राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी काल केली. मानवाधिकार दिनानिमित्त काल नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमांत त्या बोलत होत्या. सायबर गुन्हे आणि पर्यावरण बदल हे मानवाधिकारासाठी नवे धोके म्हणून समोर आले आहे. भारताकडे गरिबी आणि भुकनिर्मूलन तसंच युवकांसाठी राबवलेल्या धोरणांमुळे जागतिक स्तरावर एक उदाहरण म्हणून पाहिलं जात असल्याचे गौरवोद्गार त्यांना काढले. मानवाधिकार आयोगाकडून प्रकाशित करण्यात आलेल्या तीन पुस्तकांचं प्रकाशन यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. वैश्विक स्तरावर मानवी अधिकारांबाबत चर्चा करण्याच्या उद्देशानं 10 डिसेंबर रोजी मानवाधिकार दिवस साजरा केला जातो.

**<u>पुरस्कार</u>**

राष्ट्रीय पंचायत पुरस्कार 2024 चं वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतील विज्ञान भवन इथं होणार आहे. या वर्षी, विविध श्रेणींमध्ये एकंदर 45 पुरस्कार विजेत्यांची निवड करण्यात आली आहे, ग्रामीण भागातील तृणमुल स्तरावर प्रशासन आणि विकासासाठी काम करणाऱ्या पंचायतींना हे पुरस्कार दिले जातात. पंचायती राज मंत्री पुरस्कारप्राप्त पंचायतींच्या नाविन्यपूर्ण आणि परिणामकारक पद्धतींची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचं अनावरण करतील. या पुरस्कारांद्वारे इतर पंचायतींनी सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करुन ग्रामीण भारताच्या सर्वांगीण विकासात योगदान द्यावं असा उद्देश असल्याचं मंत्रालयानं दिलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे.

**<u>संसद</u>**

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये कालही विविध मुद्द्यांवरून झालेल्या गदारोळामुळे कामकाज आधी दोनदा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. सभागृहाच्या मर्यादेचं पालन करण्याचं आवाहन त्यांनी सदस्यांना केलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनीही चर्चेच्या माध्यमातून संसदेचं कामकाज चालवण्याचं आवाहन सदस्यांना केलं आहे. दरम्यान राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याविरुद्ध काँग्रेसप्रणित विरोधी आघाडीने अविश्वास प्रस्ताव मांडला आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांना सभागृहात बोलण्याची संधी नाकारुन अध्यक्ष पक्षपात करत असल्याने हा प्रस्ताव मांडल्याचं काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>इव्हीएम</u>**

विधानसभा निवडणुकीत व्हिव्हीपॅट पडताळणीबाबत सर्व प्रक्रियेचं तंतोतंत पालन केल्याचं, निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातल्या कोणत्याही पाच मतदान केंद्रावरच्या व्हिव्हीपॅट चिठ्ठ्या मोजल्या जातात; यानुसार 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणीवेळी या चिठ्ठ्या मोजण्यात आल्या होत्या, त्यावेळी उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित होते असं आयोगानं यात म्हटलं आहे. या मोजणीनुसार 288 मतदारसंघातल्या 1440 व्हिव्हीपॅट युनिटची मोजणी केली असता, या चिठ्ठ्या आणि मतदान यंत्रात नोंद झालेली मतं, यामध्ये कुठलीही तफावत आढळून आली नाही, असं आयोगानं जारी केलेल्या पत्रकात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**<u>स्मार्ट इंडिया हॅकेथॉन</u>**

सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी आजपासून देशभरातल्या51 केंद्रांवर सुरू होत आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून त्याचं उद्घाटन होईल. या स्पर्धेत सहभागी होत असलेल्या विद्यार्थ्यांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरस्थ माध्यमातून संवाद साधणार आहेत. या स्पर्धेत 13शे हून अधिक विद्यार्थी संघ सहभागी होत आहेत. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर आणि कोल्हापूर या चार ठिकाणी ही अंतिम फेरी पार पडणार आहे. पुण्याच्या एमआयटी विद्यापीठामध्ये स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेच्या हार्डवेअर गटाची अंतिम फेरी होणार आहे. येत्या 15 डिसेंबरपर्यंत ही महाअंतिम फेरी चालेल.

**<u>पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ</u>**

ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना संयुक्त राष्ट्रांची पर्यावरण संस्था असलेल्या UNEP चा 'चॅम्पियन ऑफ अर्थ' जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. पर्यावरणाचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी काम करणाऱ्यांना तसंच, जगभरातील वाढतं वाळवंटीकरण, दुष्काळ आणि जमिनीचा खालावत चाललेला दर्जा याविरोधात काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कारानं सन्मानित करण्यात येतं.

**<u>राजनाथ सिंग</u>**

भारत आणि रशियादरम्यानची मैत्री दृढ असून या मैत्रीसाठी भारत भविष्यातही रशियाच्या बाजुनं उभा राहील असा विश्वास संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी काल मॉस्को इथं व्यक्त केला. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची काल त्यांनी भेट घेतली. संरक्षण मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली आहे, दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संरक्षण सहकार्याच्या विविध मुद्द्यांवर चर्चा केली. दोन राष्ट्रांमधील भागीदारीमध्ये प्रचंड क्षमता आहे आणि विविध स्तरावरील एकत्रित प्रयत्नांचे चांगले परिणाम दिसत आहेत. असं निवेदनांत म्हटलं आहे. तत्पूर्वी, संरक्षण मंत्र्यांनी मॉस्को इथं त्यांचे रशियन समपदस्थ आंद्रे बेलोसोव्ह यांच्यासमवेत भारत-रशिया आंतर-सरकारी आयोगाच्या लष्करी तांत्रिक सहकार्यावरील 21 व्या बैठकीचे सह-अध्यक्षपद भुषवलं आणि विविध मुद्यावर चर्चा केली.

**<u>विद्यापिठ नुदान आयोग</u>**

विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात (UGC)नं पुढील वर्षीपासून पदवीपूर्व प्रवेशासाठी घेण्यात येणारी (CUET-UG) या सामायिक विद्यापीठ प्रवेश परीक्षेत अनेक बदल करत असल्याची माहिती आयोगाचे अध्यक्ष एम जगदेश कुमार यांनी काल दिली. पुढील वर्षापासून CUET-UG साठी इयत्ता 12 वी मध्ये कोणत्याही विषयांत शिकत असलेल्या विद्यार्थाला ही परिक्षा देता येणार आहे. यापुर्वी विज्ञान शाखेतील अनिवार्य विषयांसह ही परिक्षा देता येत होती. CUET-UG आता फक्त संगणक आधारित चाचणी होईल. CUET-UG पुढील सत्रापासून 37 ऐवजी 63 विषयांमध्ये घेण्यात येईल.

**<u>एक देश एक सदस्यता</u>**

देशभरातील विद्यापीठांत शिक्षण घेणाऱ्यांना जगभरातील प्रकाशकांनी प्रकाशित केलेलं साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशानं 'एक देश एक सदस्यता' योजनेची सुरुवात येत्या 1 जानेवारी पासून होणार आहे. केंद्र

सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार ए के सुद यांनी काल आकाशवाणीला ही माहिती दिली. 30 अग्रगण्य संशोधन प्रकाशक संस्थांकडील साहित्य उपलब्ध होणार आहे. या याजनेच्या पहिल्या टप्प्यात मुळे एकंदर 6 हजार 300 सरकारी शिक्षण संस्थांमधील 1 कोटी 77 हजारांहून अधिक विद्यार्थांना फायदा होईल. तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, गणित, वैद्यकीय, व्यवस्थापन, सामाजिक विज्ञान आणि मानवता आदी विषयांवरील प्रबंध अभ्यासासाठी उपलब्ध होतील

**<u>सिरिया-हल्ले</u>**

इस्रायली युद्ध विमानांनी राजधानी दमास्कससह संपूर्ण सीरियामध्ये अनेक हल्ले केले असल्याची माहिती ब्रिटन-स्थित सीरियन ऑब्झर्व्हेटरी फॉर ह्युमन राइट्सनं दिली. दरम्यान, अलीकडेच सीरियातील राष्ट्राध्यक्ष बशर अल-असाद यांची राजवट संपुष्टात आल्यानंतर अतिरेक्यांच्या हाती शस्त्रे पडू नयेत यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचे इस्रायलनं म्हटले आहे.

**<u>सिरीया</u>**

सीरियामध्ये मोहम्मद अल-बशीर यांची काळजीवाहू पंतप्रधान म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पुढील वर्षी 1 मार्चपर्यंत ते अंतरिम सरकारचे नेतृत्व करतील. असं बशीर यानी दुरचित्रवाणीवरील संबोधनात सांगितलं. सिरीयामध्ये बंडखोरांच्या आंदोलनानंतर बशर अल असाद यांनी देश सोडून पलायन केलं आहे. या बंडखोरी करणाऱ्या गटाचं नेतृत्व करणारे मोहम्मद अल-बशीर, यांनी यापुर्वी वायव्येकडील एका छोट्या भागात प्रशासकीय काम केलं आहे.

**<u>बस-अपघात</u>**

मुंबईतील कुर्ला इथं काल झालेल्या बस अपघाताची चौकशी करण्यासाठी बृहन्मुंबई इलेक्ट्रीक वाहतूक परिवहन मंडळानं चार सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. चालकानं सुरक्षा नियमांच पालन केलं होतं की नाही किंवा बसमध्ये काही तांत्रिक बिघाड होता यासंदर्भातील चौकशी ही समिती करेल. सोमवारी झालेल्या या अपघातात 42 जण जखमी झाले आणि 7 जणांता मृत्यू झाला आहे.

**<u>महिला क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये, पन्नास षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील तिसरा आणि अंतिम सामना आज भारत आणि यजमान ऑस्ट्रेलिया संघादरम्यान होईल. हा सामना भारतीय वेळेनुसार सकाळी 9 वाजून 50 मिनिटांनी पर्थमधील मैदानावर सुरू होणार आहे. ऑस्ट्रेलियाने मालिकेत आधीच 2-0 अशी आघाडी मिळवली आहे. त्यांनी पहिला सामना पाच गडी राखून आणि दुसरा सामना 122 धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला. हे दोन्ही सामने ब्रिस्बेन इथे झाले होते. ऑस्ट्रेलियाची जॉर्जिया व्हॉल आतापर्यंत मालिकेतील सर्वाधिक धावा करणारी खेळाडू असून तिने दोन सामन्यांत 147 धावा केल्या, तर मेगन शुट हिने सर्वाधिक सहा गडी बाद केले आहेत.

**<u>मोदी-गेम्स</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी क्वालालंपूर इथे झालेल्या 10 व्या आशिया पॅसिफिक डेफ गेम्स 2024 मध्ये, अर्थात कर्णबधीरांच्या स्पर्धांमध्ये ऐतिहासिक कामगिरी केल्याबद्दल भारतीय चमुचं अभिनंदन केलं आहे. 55 पदकं जिंकून देशासाठी अभिमानस्पद काम करणाऱ्या या प्रतिभावान खेळाडूंचं मोदी यांनी कौतुक केलं. या खेळांमधील भारताची आतापर्यंतची ही सर्वोत्तम कामगिरी आहे. संपूर्ण देशाला, विशेषत: खेळाची आवड असलेल्यांना या पराक्रमामुळे प्रेरणा मिळल्याचं मोदी यांनी म्हटलं आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार